# <u>परिपत्रक</u>

प्रिय वितरक आणि फॅन्जायझी,

आजच्या दिवसाच्या तुम्हा सगळ्यांना शुभेच्छा!!!!!

आपण सगळे आमचे अमूल्यं सक्रिय भागीदार आहात. आपणास माहिती आहेच की कंपनीचा व्यवसाय हा रिझर्व बँक ऑफ इंडीया (आर.बी.आय) द्वारे चालविला जातो. पेमेंट आणि सेटलमेंट सिस्टिम कायदा २००७ च्या नियम व कायदा आणि आर.बी.आयच्या मार्गदर्शिका, जसे अॅन्टी-मनी लॉन्डरींग (ए.एम.एल) मार्गदर्शिका, कॉम्बॅटिंग फायनान्सिंग ऑफ टेररिस्ट मार्गदर्शिका (सी.एफ.टी), नो युवर कस्टमर मार्गदर्शिका (के.वाय.सी) ह्या कंपनीच्या व्यवसायाकरीता लागू करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे कंपनी आणि सक्रिय भागीदारांची ही जबाबदारी आहे कि त्यांनी ह्या कथित नमूद केलेल्या अटींना धरून एकसंधपणे व्यवसाय करावा. कंपनी ही परिपत्रिका ह्याकरीता जाहिर करते आहे, की यामुळे कंपनीची आणि सक्रिय भागीदारांची सुरक्षा कायम राहून त्यांच्या व्यवसायावरती कोणत्याही प्रकारचा परिणाम होणार नाही.

मोठ्या प्रमाणात घडलेल्या गोष्टी ज्यांची अॅन्टी-टेररिस्ट स्कॅड, सायबर क्राईम सेल, क्राईम ब्रांच आणि भारत भरातील इतर तपासणी एजंसीच्या तपासणी केली गेली असून ,आमच्या असे लक्षात आले आहे की बऱ्याचशा वितरक आणि फ्रॅन्जायझींना खोट्या लॉटरी योजना/बनवाबनवींमध्ये सहभागी होण्याचे आमिष, लबाड/असामाजिक घटक देत आहेत.

आमच्या बऱ्याचशा प्रतिष्ठत वितरकांना आणि फ्रॅन्जायझी (आय.सी.डबल्यूंना) +९२ (पाकिस्तान) असा संकेत असणाऱ्या वेगवेगळ्या क्रमांकांवरून फोन येतात व त्यांना त्यांच्या बॅंकेचा तपशील विचारण्यात येतो. बऱ्याचशा वितरकांनी आपले बँक तपशील सुद्धा दिले आहेत आणि त्यांच्या बँकांच्या खात्यात किती तरी रुपये जमा करण्यात आलेले आहेत. मग फोन करणारी व्यक्ति वितरकाला सांगते की तुमच्या खात्यात पैसे जमा झालेले आहेत आणि मग त्यांना त्या पैशाच्या मोबदल्यात त्यांच्या इट्सकॅश कार्डचे क्रमांक आणि पासवर्ड मागण्यात येतात.

- **काही बाबतींमध्ये एक व्यक्ति एखाद्या अनोळखी व्यक्तिला फोन करतो (जरी तो वितरक किंवा आय.सी.डबल्यू नसतो) आणि बँकेचा खाते क्रमांक विचारून ( त्यांना सांगतो की त्यांना लॉटरी लागली आहे आणि प्रक्रिया शुल्क म्हणून काही पैसे जमा करण्यास सांगतो) त्यात बऱ्याच सामान्य माणसांची रक्कम ही एका अनोळखी व्यक्तिच्या खात्यात जमा करतो.**

- **मग तो त्या अनोळखी व्यक्तिला फोन करतो आणि सांगतो की त्याने आता पैसे काढू शकतो आणि त्याने इट्सकॅश वितरकाकडे जाऊन इट्सकॅश कार्ड विकत घ्यावी.**

- **एकदाका कार्ड घेतली गेली की पाकिस्तानातील व्यक्ति फोन करून त्या अनोळखी व्यक्तिला खाते क्रमांक आणि इट्सकॅश कार्डाचा पासवर्ड मागतो.**

अशा प्रकारे त्यांनी भारतातील अनेक शहरातील व्यक्तिंना फसविले आहे आणि आता पोलिस अधिकारी आणि सी.बी.आयच्या तपासणी मधून हे समोर आले आहे. आमच्या काही वितरकांना अटक सुद्धा झालेली आहे आणि ते अशाप्रकारच्या लबाडीच्या कामांमध्ये आपले बँक खाते वापरू देण्याकरीता पोलिसांच्या कोठडीत सुद्धा आहेत. तुमच्यातील कुणीही मुद्दाम किंवा चुकीने यांच्या तावडीत सापडलात जिथे अशा खोट्या लॉटरी योजना/बनवाबनवीचे प्रकार चालतात, तर त्याकरीता तुमच्या विरोधात कायदेशीर कार्यवाही केली जाईल जी ए.एम.एल/सी.एफ.टी./के.वाय.सी/पी.एस.एस या मार्गदर्शिकांच्या कायदे आणि नियमांच्या अंतर्गत असेल.

आय.एफ.टी.एस.पी.एल त्यामुळे तुम्हाला अनोळखी व्यक्तिंना फोन वरून किंवा विनंती वरून कार्डांची विक्री करताना आणि किरकोळ किंवा आय.सी.डबलू.एस नसताना सुद्धा कार्ड ही सतर्कतेने देण्याचा सल्ला देत आहे. तुम्हाला असा सुद्धा सल्ला देण्यात येतो की जर ग्राहकाला भरपूर पैशाची कार्ड हवी असतील तर तुम्ही त्याचे ओळखपत्र, पत्त्याचा पुरावा आणि खराखुरा मोबाईल नंबर कार्ड देण्यापुर्वी मागावा. तुम्हाला असा सुद्धा सल्ला देण्यात येतो की कोणत्याही अनोळखी व्यक्तिला फोन वरून इट्सकॅश कार्डाचा क्रमांक किंवा पासवर्ड सांगू नये. तुम्हाला इट्सकार्डाच्या मागच्या बाजूला छापलेला खाते क्रमांक आणि पासवर्ड खरडण्याची परवानगी दिलेली नाही.

जर कुणीही ह्या सूचनांचे उल्लंघन करीताना आढळून आले तर, आय.एफ.टी.एस.पी.एल ला हा संपुर्ण हक्क आहे की अशा खोट्या लॉटरी योजना/बनवाबनी प्रकरणांतून किंवा कोणत्याही हक्क किंवा कायदेशीर क्रियेच्या बाबतीत स्वत:ला मुक्त ठेवता येईल.

आय.एफ.टी.एस.पी.एल अशा वितरक आणि फॅन्जायझीच्या विरोधात ते खोट्या योजनांमध्ये गुंतलेले आढळल्यास योग्य ती कायदेशीर कार्यवाही करेल.आय.एफ.टी.एस.पी.एल च्या जर लक्षात आले की वितरकांचा पैसा हा बनवाबनवी किंवा खोट्या योजनांच्या गुंतागूंतीमधून आलेला आहे, तर त्या पैशावरती रोखसुद्धा लावण्यात येऊ शकते.

जर तुम्हाला असा कोणताही फोन आला किंवा अशी एखादी घटना निदर्शनास आली तर तुम्हाला त्वरीत आय.एफ.टी.एस.पी.एल ला सूचित करण्याची विनंती करण्यात येते, ज्याकरीता ०२२-६११२५७५७ हा क्रमांक किंवा ई-मेल- help@itzcash.com दिला गेलेला आहे.

तुम्हाला असा सल्ला देण्यात येतो की अनोळखी संशयीत फोनवर बोलू नये किंवा आपला वेळ त्याकरिता खर्च करु नये व बनवाबनला बळी पडू नये.

धन्यवाद

द्वारा इंटरॅक्टिव्ह फायनॅन्शियल अ‍ॅन्ड ट्रेडिंग सर्व्हिसेस प्रा.लि.

२६/०४/२०११